स्थापना दि. २५/१२/१९६१ • रजि. नं. ३०७९९ दि. २१/११/१९६१
रिझर्व्ह बँक परवाना नं. यु.बी.डी.एम्.एच्./६२५ पी. ३०/१०/१९८६

दि वणी मर्चन्टस् को-ऑप. बँक लि., वणी

ऑडिट वर्ग 'अ'

''परिस'' शिवाजीरोड, **वणी**, ता. दिंडोरी, जि. नाशिक
☎ (02557) 220140/220015 ✉ vmc_bank@rediffmail.com / vmc_bank@vmcbank.co.in

६९ वा वार्षिक अहवाल २०२५-२०२६



TRUST | SERVICE | INTEGRITY | GROWTH | COMMUNITY

* सहकार महर्षी *



स्व.श्री.किसनलालजी शं. बोरा
संस्थापक संचालक

* संचालक मंडळ *



श्री. महेंद्र कि. बोरा
चेअरमन



श्रीमती अनिता अ. देशमुख
व्हा.चेअरमन



श्री.रिखबचंद दे. बाफणा
संचालक



श्री. अशोक. प. बागमार
संचालक



श्री.सुभाष ने. खाबिया
संचालक



श्री.विलास ना. कड
संचालक



डॉ.श्री.महेंद्र रा. भुतडा
संचालक



श्री.नरेंद्र ए. खांडे
संचालक



श्री.हिदायत अ. मुल्ला
संचालक



श्री.संजय क. वाघ
संचालक



श्री.प्रकाश पं. सोनवणे
संचालक



श्री.शांतीलाल र. चोपडा
संचालक



श्री.प्रकाशकुमार बं. बोरा
संचालक



सौ.मनिषा हे. वडनेरे
संचालिका



श्री. दौलत दे. गावीत.
संचालक



श्री.अशोक ज. मोदी
(C.A.) तज्ञ संचालक



श्री. हेमराज जु. खाबिया
(C.A.) तज्ञ संचालक



श्री.कमलाकर का. आहेर
सल्लागार



श्री.विजय र. बोथरा
सल्लागार



श्री.पारसमल वा. सिसोदिया
सल्लागार



श्री.अनिलकुमार रा. घिया
मुख्य कार्य. अधिकारी

वार्षिक सर्वसाधारण सभा सुचनापत्र

(फक्त सभासदांकरीता)
सन २०२५-२०२६

दि वणी मर्चन्टस् को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सर्व सन्माननिय भागधारक सभासदांना कळविणेत येते की, आपल्या बँकेची **६५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक २१/०९/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजता बँकेच्या वणी येथील मुख्य कार्यालयाचे सभागृहात बँकेचे चेअरमन मा. श्री. महेंद्र किसनलाल बोरा** यांचे अध्यक्षतेखाली खालील नमुद विषयांचा विचार विनिमय करणेसाठी बोलविण्यात येत आहे. तरी कृपया सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

-: सभेपुढे येणारे विषय :-

१. दिनांक २२/०९/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दिनांक ३१/०३/२०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रकास वाचून मंजुरी देणे.
३. मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२५-२०२६ च्या नफा वाटणीस मंजुरी देणे.
४. सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाकरिता संचालक मंडळाने तयार केलेल्या उत्पन्न व खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे व सन २०२५-२०२६ च्या अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
५. सन २०२५-२०२६ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची वाचून नोंद घेणे.
६. सन २०२७-२०२८ या आर्थिक वर्षाकरिता समवर्ती हिशोब तपासणीसाची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
७. मा. संचालक मंडळाने सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाकरिता नेमणुक केलेल्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या नेमणुकीस व शासनाच्या नियमाप्रमाणे त्यांचा मेहनताना अदा करण्यास मंजुरी देणे.
८. बँकेचे संचालक व त्यांचे निकटचे नातेवाईक यांचेकडून येणे असलेल्या कर्जाची सहकारी कायदा कलम ७५(२) अन्वये माहिती घेणे.
९. बँकेने बाहेरुन अतिरिक्त उचल केलेल्या कर्जाची माहिती घेऊन त्यास मान्यता देणे.
१०. एकरकमी कर्ज फेड योजने अंतर्गत बंद केलेल्या कर्ज खात्याची नोंद घेणे.
११. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित राहिलेल्या सभासदांची गैरहजेरी क्षमापित करणे बाबत विचार विनिमय करणे.
१२. पोटनियम दुरूस्तीकरणे बाबत विचार विनिमय करणे.
१३. बँकेच्या इमारतीच्या नुतनीकरणास झालेल्या खर्चाची नोंद घेऊन त्या खर्चास मंजुरी देणे.
१४. मा. अध्यक्षांचे पूर्व परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

ठिकाण : वणी
दिनांक : १९/०८/२०२६

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून
श्री. अनिलकुमार रायचंद घिया
मुख्य कार्यकारी अधिकारी

सूचना

१) गणसंख्येअभावी सभा तहकुब झाल्यास सदर सभा त्याचदिवशी त्याच ठिकाणी दुपारी ३.३० वाजता घेणेत येईल. सदर सभेस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२) वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषयासंबंधी काही प्रश्न अगर सुचना असल्यास त्या बुधवार दि. १६/०९/२०२६ पर्यंत बँकेच्या वणी येथील कार्यालयात मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे कार्यालयीन वेळेत लेखी आणून द्याव्यात.
३) कृपया सभेस येतांना अहवालाची प्रत सोबत आणावी.



अध्यक्षीय मनोगत..

सन्माननिय सभासद बंधु भगिनींनो,
सप्रेम नमस्कार,

आपल्या बँकेच्या ६५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित असलेल्या माझ्या सर्व सभासद बंधू-भगिनींचे मी मन:पूर्वक स्वागत करतो.

आजच्या या प्रसंगी आपल्या बँकेचे संस्थापक, सहकार क्षेत्रातील आदरणीय व्यक्तिमत्त्व स्वर्गीय श्री. किसनलालजी बोरा (भाऊ) यांचे मी कृतज्ञतापूर्वक स्मरण करतो. त्यांनी सहकाराची जी भक्कम पायाभरणी केली, त्याच मूल्यांवर विश्वास, पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि सामाजिक बांधिलकी या तत्त्वांवर आपली बँक आज पुढे वाटचाल करीत आहे.

मागील वर्ष हे केवळ आपल्या बँकेसाठीच नव्हे, तर संपूर्ण आर्थिक आणि बँकिंग क्षेत्रासाठी अनेक आव्हानांचे होते. जागतिक पातळीवरील युद्धजन्य परिस्थिती, आर्थिक अनिश्चितता, बाजारपेठेतील चढ-उतार, व्याजदरातील बदल, वाढती स्पर्धा आणि वेगाने बदलणारे तंत्रज्ञान या सर्वांचा परिणाम बँकिंग क्षेत्रावर होत आहे.

या सर्व परिस्थितीतही आपल्या सभासदांचा विश्वास, संचालक मंडळाचे मार्गदर्शन आणि अधिकारी-कर्मचारी यांच्या प्रामाणिक व सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आपल्या बँकेने समाधानकारक प्रगती साधली आहे. ही प्रगती केवळ बँकेची नसून प्रत्येक सभासदाची आणि आपल्या संपूर्ण वणी परिसराची प्रगती आहे.

आपल्या बँकेला सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल मिळालेले ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशन २०२५ चे पुरस्कार तसेच महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक फेडरेशनकडून मिळालेला सन्मान ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. पुरस्कार हा आपल्या प्रवासाचा शेवट नसून, पुढील मोठ्या ध्येयाची सुरुवात आहे.

आपल्या बँकेने कर्जवाटपामध्ये वाढ करताना कर्जाची गुणवत्ता, वसुली आणि एन.पी.ए. नियंत्रणावर विशेष भर दिला आहे. बँकेचे नेट एन.पी.ए. चे प्रमाण ०.००% ठेवण्यात आपल्याला यश आले आहे. ही बाब बँकेच्या आर्थिक शिस्तीचे आणि सक्षम व्यवस्थापनाचे द्योतक आहे.

बँकेने अहवाल वर्षात कोणतीही अतिरिक्त जोखीम न घेता कर्ज वाटप करुन सी.डी. रेशो ५१.४५% पर्यंत वाढविला आहे. ३१ मार्च २०२६ अखेर बँकेच्या ठेवी रु. ८२ कोटी २१ लाख व कर्ज रु. ४२ कोटी ३० लाख असुन बँकेस १ कोटी १२ लाख इतका निव्वळ नफा झालेले आहे.

माननीय वैधानिक लेखापरिक्षक यांनी सन २०२५-२६ या वर्षाकरिता बँकेला ऑडिट वर्ग 'अ' प्रदान केला आहे ही आपणासर्वांसाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे.

आपल्या बँकेने जोखीम व्यवस्थापन, ग्राहकसेवा, डिजीटल परिवर्तन आणि व्यवसाय वृध्दी यावर विशेष भर दिला आहे. भागधारकाचा व ग्राहकांचा विश्वास, संचालक मंडळाचे मार्गदर्शन आणि कर्मचारी वृंद यांची समर्पित सेवा यामुळे बँकेचा एकुण व्यवसाय १२४५१.९५ लाख इतका झाला आहे.

आज बँकिंगचा चेहरा झपाट्याने बदलत आहे. मोबाईल बँकिंग, UPI, डिजिटल पेमेंट, ऑनलाईन सेवा, SMS अलर्ट, ATM Card आणि इतर आधुनिक सुविधांचा अधिकाधिक विस्तार करण्याचा आपला प्रयत्न राहील.

आपले ध्येय असे असेल ''बँक तुमच्या दारी नव्हे, तर तुमच्या मोबाईलमध्ये!'' सभासदांनीही डिजिटल बँकिंगचा सुरक्षित आणि योग्य वापर करावा, यासाठी बँकेकडून आवश्यक मार्गदर्शन केले जाईल.

बँकेच्या विकासासाठी ठेवी हा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे आपल्या बँकेच्या ठेवी वाढविण्यासाठी प्रत्येक सभासदाने आपल्या कुटुंबातील तसेच परिचितांच्या ठेवी आपल्या बँकेत आणण्यासाठी सहकार्य करावे. त्याचबरोबर कर्जवाटप करताना कर्ज द्या, पण योग्य व्यक्तीला, योग्य कारणासाठी आणि योग्य क्षमतेनुसार द्या या तत्त्वाचा अवलंब करू. शेती, उद्योग, व्यापार, छोटे व्यावसायिक, महिला उद्योजक, तरुण उद्योजक, घरकुल, वाहन, शिक्षण आणि स्थानिक व्यवसायांना आवश्यक आर्थिक पाठबळ देणे हे आपल्या बँकेचे महत्त्वाचे उद्दिष्ट राहील.

आजची तरुण पिढी ही उद्याची ग्राहक आणि उद्योजक आहे. त्यामुळे तरुणांसाठी आधुनिक बँकिंग सेवा, डिजिटल सुविधा, व्यवसायासाठी आर्थिक मार्गदर्शन आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्याचा आपला प्रयत्न राहील.

''आजचा तरुण ग्राहक नाही; तो उद्याचा उद्योजक आहे.''

आजपर्यंत बँकेच्या प्रगतीसाठी मार्गदर्शन आणि सहकार्य करणाऱ्या सर्व सभासदांचे, संचालक मंडळाचे, मुख्य कार्यकारी अधिकारी, व्यवस्थापक, अधिकारी, कर्मचारीवर्गाचे मी मन:पूर्वक आभार मानतो. तसेच विविध शासकीय व नियामक संस्था, भारतीय रिझर्व्ह बँक, सहकार विभाग, महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशन ॲण्ड असोसिएशन, ऑडिटर, कायदेविषयक सल्लागार, विविध संस्था, हितचिंतक आणि आपल्या बँकेशी संबंधित सर्व व्यक्तींचे मी मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.
आपण सर्वांनी यापुढेही असेच सहकार्य करावे, ही मन:पूर्वक अपेक्षा व्यक्त करतो.

धन्यवाद!

जय हिंद! जय महाराष्ट्र!! जय सहकार!!!

आपला स्नेहांकित,
श्री. महेंद्र किसनलाल बोरा
चेअरमन

* भावपुर्ण श्रध्दांजली *

अहवाल वर्षात बँकेचे माननीय सभासद, ठेवीदार, खातेदार, ज्ञात, अज्ञात व्यक्ती पंचत्वात विलीन झाल्या. तसेच देशातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, विज्ञान, साहीत्य, कला व सहकार क्षेत्रातील मान्यवर तज्ञ, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, समाजसेवक, संशोधक, शिक्षणतज्ञ, जवान सर्व क्षेत्रातील कलावंत दिवंगत झाले यांना आम्ही भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहोत. दिवंगतांच्या कुटुंबियांच्या दु:खात आम्ही सहभागी असून मृतांचे आत्म्यास सद्गती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

व्यक्तीश : माझ्यातर्फे, संचालक मंडळ, सभासद, ठेवीदार, हितचिंतक, ग्राहक व कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली.

बँकेच्या विकासाची वाटचाल – तुलनात्मक ओझरती नजर (Performance Indicators) (रक्कम रू.लाखात)

अ. नं.	तपशिल	सन २०१८	सन २०१९	सन २०२०	सन २०२१	सन २०२२	सन २०२३	सन २०२४	सन २०२५	सन २०२६
१	भाग भांडवल खपलेले	११२.१७	१२४.९१	१३३.६५	१३९.४६	१४३.९८	१५०.३७	१५४.१२	१५९.३६	१६३.३६
२	निधी	३६१.३८	३८८.२१	४४०.४७	५४१.३५	७४९.३२	७८९.६०	८८०.२६	९६०.८७	१०४४.०८
३	नक्त संपत्ती	४५३.७६	५१७.४१	५२५.८१	५७४.२६	६२६.१७	६३०.५५	६९३.८५	७६५.६५	९२८.९८
४	ठेवी	५२३७.३३	५४६८.४०	६३०८.५४	६८६०.७८	६९७९.४५	६७०५.२६	७२१७.०६	७६४५.१३	८२२१.६५
५	कर्ज येणे बाकी	१५६१.६३	२०५५.९३	२१३०.१२	२३५६.४७	२३४७.०५	२८००.१२	२८६३.८९	३५०२.२०	४२३०.३०
	एकुण व्यवसाय	**६७९८.९६**	**७५२४.३३**	**८४३८.६६**	**९२१७.२५**	**९३२६.५०**	**९५०५.३८**	**१००८०.९५**	**१११४७.३३**	**१२४५१.९५**
६	गुंतवणूक	३५५४.९८	३३१८.७१	४११४.९९	४७४९.२८	४१०४.६८	३९३६.७५	३८१२.१२	३८१२.१२	३८१२.१२
७	निव्वळ नफा	३९.०८	५३.४६	५५.४२	५३.९७	४७.३२	१००.४८	९०.७२	९६.७९	११२.२९
८	खेळते भांडवल	५७०७.९१	६०६५.१८	६९६८.३१	७६५०.०१	७९४८.६९	७७८१.६१	८३७७.००	८८८९.६८	९५६४.६०
९	ग्रॉस एन.पी.ए.चे एकुण कर्जाशी प्रमाण	५.३२%	३.०३%	२.६७%	२.८८%	२.११%	०.८२%	०.६९%	०.३४%	०.३४%
१०	निव्वळ एन.पी.ए.चे एकुण कर्जाशी प्रमाण	१.८२%	०.६१%	०.००%	०.००%	०.००%	०.००%	०.००%	०.००%	०.००%
११	भांडवलाचे एकुण मालमत्तेशी प्रमाण (CRAR)	२५.६१%	२४.१९%	२४.६८%	२५.४२%	२७.२८%	२७.५२%	२४.०५%	२५.१२%	२३.६४%
	एकुण सेवक	१४	१५	१८	१३	१५	१४	१४	१९	१६
१२	प्रति सेवकामागे व्यवसाय	४८५.६४	५०१.६२	४६८.८१	७०९.०१	६२१.७७	६७८.९६	७२०.०६	५८६.७०	७७८.२५

थकबाकी : थकबाकी हा बँकेच्या आर्थिक व्यवहारातील व एकुणच बँकेच्या जडणघडणीतील महत्वपूर्ण विषय आहे. थकबाकी होवू नये आणि असलेली थकबाकी वेळचेवेळी वसूल व्हावी म्हणून बँकेने योग्य ती काळजी घेतलेली आहे. अहवाल सालात एकुण थकबाकी २४.६७ लाख असून थकबाकीचे कर्जवाटपाशी प्रमाण ०.५८% आहे. थकबाकी कमी होण्याच्या प्रमाणात संख्यात्मक प्रगती झालेली दिसून येत आहे याचे श्रेय सर्व सभासद, खातेदार व कर्मचारी वृंद यांचेच आहे. थकबाकी कमी करण्यामध्ये अशीच प्रगती व बँकेविषयी आत्मीयता राहील्यास बँकेची थकबाकी शुन्य टक्क्यावर येईल. तरी कृपया सभासदांनी बँक आपली आहे हा विचार समोर ठेवून सहकार्य करावे ही नम्र विनंती.

एन. पी. ए. : रिझर्व्ह बँकेच्या नियमापेक्षा एन. पी. ए ची टक्केवारी ही खुपच खाली आणण्यात बँकेने सातत्य राखलेले आहे. दिनांक ३१ मार्च २०२६ अखेर उत्पन्नक्षम नसलेल्या ढोबळ कर्जाची रक्कम रु १४.४० लाख असून त्याचे येणे कर्जाशी प्रमाण ०.३४% आहे. उत्पन्नक्षम नसलेल्या निव्वळ कर्जाची रक्कम रु. ०.०० लाख मात्र असुन त्याचे निव्वळ कर्जाबरोबर प्रमाण ०.००% लाख मात्र आहे.

कर्ज : दि. ३१ मार्च २०२६ अखेर बँकेने सर्व सभासद, ग्राहक बांधवांना व्यापार व उद्योगधंद्यात वाढ करणेसाठी गरजेनुसार कर्ज पुरवठा केलेला आहे. ठेवीदाराने बँकेत ठेवलेल्या ठेवी बँकेला, ठेवीदाराचा विश्वस्त या नात्याने रिझर्व्ह बँकेचे नियम, बँकेचे कर्ज नियम, उपविधी व संचालक मंडळांची धोरणे यांचा विचार करुन बँकेला सभासदांना कर्जपुरवठा करावा लागतो बँकेचे उत्पन्न प्रामुख्याने कर्जावरील व्याजावर असते. या सर्व गोष्टी कर्ज वसुलीवर अवलंबुन असतात. बँकेने एकुण कर्ज वाटप रुपये ४२,३०,३०,३४१.५१/– इतके असुन मागील वर्षापेक्षा रुपये ७,२८,०९,९५३.१२/– ने वाढ झालेली आहे.

ठेवी : दिवसें दिवस बँकिंग क्षेत्रामध्ये आमुलाग्र बदल होत आहेत. बँकामधील स्पर्धा, राष्ट्रीय स्तरावरील आर्थिक घडामोडी या सर्व बाबींचा विचार करता आपल्या बँकेच्या दि. ३१/०३/२०२६ अखेर सर्व प्रकारच्या ठेवी रुपये ८२,२१,६४,९८२.१०/– इतक्या आहेत. चालू वर्षी बँकेच्या ठेवीमध्ये रुपये ५,७६,५१,७४७.१५/– वाढ झालेली आहे.

ठेवी विमा योजना : आपल्या बँकेतील ग्राहकांच्या ठेवीच्या सुरक्षिततेसाठी डिपॉझीट इन्शुरन्स ॲण्ड क्रेडीट गॅरंटी कार्पोरेशन लि., मुंबई यांचेकडे ठेवींचा विमा उतरविण्यात आलेला असुन बँकेने अहवाल सालामध्ये ठेव विमा हप्त्याची रक्कम १०,५२,६६६.९०/- भरली आहे. डिपॉझीट इन्शुरन्स ॲण्ड क्रेडीट गॅरंटी कार्पोरेशने ठेव विम्याची मर्यादा रु. ५ लाख इतकी आहे. बँकेतील ठेवी सुरक्षित असलेने ठेवीदाराने, सर्व सभासद बंधु-भगिनी व हितचिंतक यांनी आपल्या ठेवी बँकेत ठेऊन सहकार्य करावे, ही विनंती.

संचालक / नातेवाईक यांना दिलेली कर्जे (Advances to Directors & their Relatives)
(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७५ (२) प्रमाणे) (रक्कम रूपये लाखात)

अ. नं.	संचालक / नातेवाईक	वर्षाच्या सुरूवातीला येणे बाकी रूपये	अहवाल सालात दिलेली कर्जे	अहवाल सालात फेडलेली कर्जे रु.	येणे बाकी ३१/३/२०२६ रु.	पैकी थकबाकी
१.	संचालकांना दिलेली कर्जे	१७.२५	१३.७३	२३.०२	७.९६	-
२.	नातेवाईकांना दिलेली कर्जे	३८.२१	४३.५०	३१.६४	५१.०८	-
	एकुण	५५.४६	५७.२३	५४.६६	५९.०५	-

एकरकमी कर्ज परतफेड योजना (OTS)

दि. ३१/०३/२०२६ अखेर एकरकमी कर्ज (OTS) परतफेड योजने अंतर्गत खालीलप्रमाणे कर्ज खाती तडजोड करुन बंद करण्यात आली आहे.

कर्ज खाती	खाते बंद करतेवेळी एकुण येणे रक्कम	तडजोडीची रक्कम	सुट दिलेली रक्कम
१	४७८७०	९८३१	३८०३९

नफा व नफा वाटणी (Profit and Proposed Appropriation of Net Profit)

बँकेस निव्वळ नफा रु. १,१२,२९,१०१.६२ इतका झाला आहे. अधिक गतसालचा शिल्लक नफा रु. ६७२.८९ मिळून वाटणीसाठी उपलब्ध नफा रु. १,१२,२९,७७४.५१ इतका आहे. संचालक मंडळाने सन २०२५-२६ मध्ये झालेल्या नफ्याची वाटणी पुढीलप्रमाणे सुचविली आहे. कृपया सर्व सभासदांनी सदरच्या नफा वाटणीस मान्यता द्यावी ही विनंती.

तपशिल	रक्कम रूपये
गंगाजळी (राखीव निधी) २५%	२८,०७,४४४.०३
लाभांश वाटणीसाठी	२४,१७,४९६.००
तंत्रज्ञान विकास निधी	१,००,०००.००
इमारत निधी	३५,००,०००.००
गुंतवणूक चढ उतार निधी	११,०२,०००.००
सभासद कल्याण निधी	१,००,०००.००
सभासद भेट वस्तु निधी	११,००,०००.००
शिक्षण निधी	१,००,०००.००
पुढील वर्षासाठी शिल्लक नफा	२,८३४.४८
एकुण	**१,१२,२९,७७४.५१**

हिशोब तपासणी : दि. ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ या कालावधीचे वैधानिक लेखापरीक्षण धोंडगेपाटील गोधाणी आणि कं., नाशिक यांनी व समवर्ती लेखा परीक्षण मिलन सी लुणावत अँड कंपनी, चार्टर्ड अकौटंट, यांनी पुर्ण केलेले असुन त्यांनी बँकेच्या कामकाजाबद्दल व प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले आहे. त्यांनी केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल बँक त्यांची आभारी आहे.

ऑडीट वर्ग : सन २०२५-२६ या वर्षाकरीता ऑडीट वर्ग **'अ'** मिळालेला आहे. बँकेची पारदर्शक कामकाज पध्दती व एकंदर व्यवसायातील वाढ थकबाकी कमी, एन. पी. ए. प्रमाण कमी या सर्वाचा विचार करुनच वैधानिक हिशोब तपासणीस यांनी **'अ'** वर्ग दिलेला आहे.

सन २०२५-२०२६
परिशिष्ट : ''अ''

बँकेचे नांव	:	**दि वणी मर्चन्टस् को-ऑप बँक लि., वणी**
मुख्य कार्यालयाचा पत्ता	:	''परीस'', शिवाजी रोड, वणी ता. दिंडोरी जि. नाशिक पिन ४२२ २१५, फोन नं. (०२५५७) २२०१४०, २२००१५
नोंदणी क्रमांक	:	३०७९९, दिनांक २१/११/१९६१
भारतीय रिझर्व्ह बँक परवाना नंबर व दिनांक	:	युबीडी एम.एच./६२५ पी., दि. ३०/१०/१९८६
कार्यक्षेत्र	:	नाशिक जिल्हा

अ.नं.	तपशिल	दि. ३१ मार्च २०२६		(रक्कम रू.लाखात)
१.	शाखांची संख्या (मुख्य कार्यालयासह)			१+३
२.	सभासद	नियमित : –	४३५४	५१०४
		नाममात्र :–	७५०	
३.	वसुल भाग भांडवल			१६३.३६
४.	राखीव व इतर निधी			१०४४.०८
५.	ठेवी	अ) बचत	३४३२.२९	८२२१.६५
		ब) चालू	१७१.२५	
		क) इतर व मुदत ठेवी	४६१८.११	
६.	दिलेली कर्जे	अ) सुरक्षित	४२१४.७१	४२३०.३०
		ब) असुरक्षीत	१५.५९	
		एकुण कर्जाच्या		
		अ) अग्रक्रम क्षेत्रासाठी :	३४६३.०२	
		ब) दुर्बल घटकांसाठी :	१४४६.७८	
७.	घेतलेली कर्जे			००.००
८.	गुंतवणुक	अ) सहकारी संस्थांचे भागभांडवल	०.१६	४८७५.६४
		ब) मुदत ठेवीत	१०६३.३६	
		क) सरकारी रोखे	३८१२.१२	
		ड) इतर	००.००	
९.	थकबाकीची टक्केवारी			०.५८%
१०.	ऑडीट वर्ग	२०२३–२०२४/२४–२५/२५–२६		**''अ''**
११.	एकुण कर्मचारी	१) अधिकारी	७	१६
		२) व्दितीय श्रेणी व इतर	९	
१२.	खेळते भांडवल			९५६४.६०

PRUDENTIAL NORMS

Statements of Capital Funds, Risk Assets / Exposures and Risk Assets Ratio As on 31/03/2026

Name of Bank : The Vani Merchant's Co-Op. Bank Ltd., Vani (Nashik) (₹ in Lakh)

Sr. No.	Particulars	Amount 31/03/2025	Amount 31/03/2026
1.	Capital to Risk Assets Ratio	25.12	23.64
2.	Movement Of CRAR	1.07	-1.48
3.	Investment (Includes Govt & Other Trustee Securities)		
	a) Face Value Of Investments	3815.40	3815.40
	b) Book Value Of Investments	3812.12	3812.12
	c) Market Value Of Investments	3722.22	3700.14
4.	Advances Against real estate Construction Business, Housing	394.99	527.93
5.	Advances Against Share & Debentures	0.00	0.00
6.	Advances To directors their Relatives, Companies/Firms	55.46	59.05
	a) Fund Based	55.46	59.05
	b) Non Fund based (Guarantee, LC etc.)	--	--
7.	Cost of Deposits	5.01	5.01
8.	NPA		
	a) Gross NPA	11.96	14.40
	b) Net NPA	0.00	0.00
9.	Movement in NPA (Rs.)		
	a) Gross NPA-	-7.84	2.44
	b) Net NPA	0.00	0.00
10.	Profitability		
	a) Interest Income as percentage of working Funds	6.60	6.69
	b) Non-Interest Income as a percentage of working Funds	0.46	0.33
	c) Operating Profit as percentage of workings Funds	1.08	1.61
	d) Return on earning assets	7.86	8.04
	e) Business (Deposits + advances) per employee	586.70	778.25
	f) Profit per Employee	5.09	7.02
11.	Provisions made towards		
	a) NPAs (BDDR)	-11.00	1.00
	b) Depreciation on Investment	0.00	0.00
	c) Standard Asset Provision	2.00	2.00
12.	Movement in Provision		
	a) Towards NPAs (BDDR)	60.00	61.00
	b) Towards Depreciation On Investment	224.64	224.64
	c) Towards Standard Assets	12.00	14.00
13.	Foreign Currency Assets and Liabilities	--	--

The Vani Merchant Co-Operative Bank Ltd., Vani - Statutory Audit 2025-26

SECTION 8

फॉर्म क्र. एन-१

[धारा ८१ आणि नियम ६९ (३) पाहा]

स्वतंत्र लेखापरीक्षकांचा अहवाल

प्रति,

चेअरमन/सर्वसभासद

दि. वणी मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.,

परिस, शिवाजी रोड, वणी, तालुका दिंडोरी,

जिल्हा नाशिक, महाराष्ट्र ४२२२१५

वित्तीय विवरणांवरील अहवाल (वैधानिक लेखापरीक्षक म्हणून)

१. आम्ही वणी मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह बँक लि. चे संलग्न वित्तीय विवरणांचे लेखापरीक्षण केले आहे, जे ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या समाप्तीपर्यंतच्या ताळेबंद व नफा-तोटा पत्रक यांचा समावेश करतात आणि दिनांक १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीसाठी बँकेसह तिच्या शाखांचे आम्ही लेखापरीक्षण केलेले इतर स्पष्टीकरणासह महत्वाच्या लेखांकन धोरणांचा सारांश यांचा समावेश आहे.

वित्तीय विवरणांबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी

२. या वित्तीय विवरणांची तयारी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०, बँकिंग विनियमन अधिनियम, १९४९ (ए.ए.सी.एस.) व रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार करणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. ही जबाबदारी या वित्तीय विवरणांमध्ये फसवणूक किंवा चुका यांमुळे कोणतेही भौतिक चुकीचे विधान राहू नये, यासाठी योग्य अंतर्गत नियंत्रण तयार करणे, अंमलात आणणे व देखभाल करणे यांचा समावेश आहे.

लेखापरीक्षकाची जबाबदारी

३. या वित्तीय विवरणांवर मत नोंदवणे ही आमची जबाबदारी आहे. आम्ही आमचे लेखापरीक्षण द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया यांनी निर्धारित केलेल्या लागू असलेल्या मानकांनुसार तसेच एम.सी.एस. ॲक्ट / बी.आर. ॲक्ट / आर.बी.आय. मार्गदर्शक तत्वांनुसार केले आहे. हे मानक नैतिक आवश्यकता पाळणे व लेखापरीक्षण योजनेसाठी नियोजन करणे व ते पूर्ण करणे याची आवश्यकता ठरवतात.

४. लेखापरीक्षणामध्ये वित्तीय विवरणांतील रक्कम व खुलाशांबाबत पुरावे गोळा करण्यासाठी प्रक्रियेचे अंमलबजावणी करणे आवश्यक असते. प्रक्रिया लेखापरीक्षकाच्या निर्णयावर अवलंबून असते, ज्यामध्ये फसवणूक किंवा चुकीमुळे वित्तीय विवरणांमध्ये भौतिक चुकीचे विधान होण्याच्या जोखमीचे मूल्यांकन समाविष्ट असते. त्या जोखमीचे मूल्यांकन करताना, लेखापरीक्षक बँकेचे अंतर्गत नियंत्रण विचारात घेतो. लेखापरीक्षक लेखांकन धोरणांची योग्यतता व व्यवस्थापनाने केलेल्या लेखांकन अंदाजांची व वित्तीय विवरणांचे एकूण सादरीकरण यांचीदेखील मूल्यांकन करतो.

५. आम्हाला मिळालेल्या लेखापरीक्षण पुराव्यांवरून आमच्या मतासाठी ते पुरेसे व योग्य आहेत, असे आम्हाला वाटते.

मत

६. आमच्या मते व आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार आणि दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, संबंधित नोंदींसह ही खाती बँकिंग विनियमन अधिनियम, १९४९ (ए.ए.सी.एस.), महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम,

Dhondgepatil Godhani & Co., Chartered Accountants, Nashik

The Vani Merchant Co-Operative Bank Ltd., Vani - Statutory Audit 2025-26

१९६१ आणि इतर लागू कायदे व नोंदणी प्राधिकाऱ्याद्वारे जारी परिपत्रक यानुसार बँकेसाठी आवश्यक त्या प्रकारे माहिती देतात व भारतामध्ये सामान्यतः स्वीकृत असलेल्या लेखांकन तत्वांनुसार खरी व योग्य अशी स्थिती दर्शवतात:

(१) बॅलन्स शीटच्या बाबतीत, ३१ मार्च, २०२६ रोजी बँकेची स्थिती दर्शवते;

(२) नफा-तोटा पत्रकाच्या बाबतीत, त्या दिवशी संपलेल्या वर्षासाठी नफा / तोटा दर्शवते;

इतर कायदेशीर व नियामक बाबतीत अहवाल

७. बॅलन्स शीट व नफा तोटा खाते बँकिंग विनियमन अधिनियम, १९४९ च्या कलम २९ वाचून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ यांच्या तरतुदींनुसार तयार केले गेले आहेत.

८. आम्ही अहवाल देतो की:

(अ) आम्हाला लेखापरीक्षणाच्या उद्देशासाठी आवश्यक सर्व माहिती व स्पष्टीकरणे मिळाली असून ती समाधानकारक आहेत.

(ब) बँकेच्या व्यवहारांचा आम्हाला आलेला ज्ञानानुसार बँकेच्या अधिकाराच्या मर्यादेत आहेत.

(क) बँकेच्या कार्यालयांतील व शाखांतील प्राप्त परताव्यांचा लेखापरीक्षणासाठी उपयोग पुरेसा आहे.

९. आमच्या मते, बॅलन्स शीट व नफा तोटा खाते लागू असलेल्या लेखांकन मानकांनुसार तयार केले आहेत.

१०. आम्ही पुढीलप्रमाणे अहवाल देतो:

(१) आमच्या अहवालाद्वारे हाताळलेली बॅलन्स शीट व नफा तोटा खाते यांची खाती व परतावे यांच्याशी सुसंगत आहेत.

(२) आमच्या तपासणीतून असे आढळते की कायद्यानुसार बँकेने आवश्यक त्या पद्धतीने खाती ठेवली आहेत.

(३) आम्ही लेखापरीक्षण केलेल्या शाखांच्या अहवालांचा समावेश आम्ही आमच्या अहवालात आवश्यक त्या प्रकारे केला आहे.

(४) लेखापरीक्षणाच्या वर्षासाठी बँकेला "अ" वर्ग दिला गेला आहे.

धोंडगे पाटील गोधाणी अँड कंपनी,
सनदी लेखापाल

Amole Desale

DHONDGE PATIL GODHANI & CO. CHARTERED ACCOUNTANTS Firm Reg.No. 120369W

सीए. अमोल तुकाराम देसले
भागीदार
सदस्यता क्रमांक-१४००४०
FRN-१२०३६९W

ठिकाण: नाशिक
तारीख: २४/०६/२०२६

Audit Panel Number- १७४२५
UDIN- 26140040IYLNUX8086

ANNEXURE I FORM A
Form Balance Sheet As on 31st March 2026

तपशिल	Particulars	परिशिष्ट	As on 31 March 2026 (Current Year)	As on 31 March 2025 (Previous Year)
भांडवल व देणी	**Capital and Liabilities**			
भाग भांडवल	Capital	१	१,६३,३५,९२५.००	१,५९,३५,८७५.००
गंगाजळी व इतर निधी	Reserves and Surplus	२	११,५६,३७,३५६.८३	१०,५७,६५,८८७.२१
ठेवी	Deposits	३	८२,२१,६४,९८२.१०	७६,४५,१३,२३४.९५
घेतलेले कर्ज	Borrowings	४	०.००	०.००
इतर देणी व तरतुदी	Other Liabilities & Provisions	५	५९,४३,३००.६५	५६,९०,५२५.६०
एकुण	**Total**		**९६,००,८१,५६४.५८**	**८९,१९,०५,५२२.७६**
मालमत्ता	**Assets**			
रोख व रिझर्व्ह बँकेतील शिल्लक	Cash and Balances with RBI, SBI	६	८८,११,०००.००	१,७०,६१,०००.००
इतर बँकांतील शिल्लक व ठेवी	Balances with Banks and Money at call short Notice	७	१२,९८,०८,८३१.७८	१२,६५,४७,४८२.०५
गुंतवणुक	Investment	८	३८,१२,२८,०००.००	३८,१२,२८,०००.००
कर्ज	Advances	९	४२,३०,३०,३४१.५१	३५,०२,२०,३८८.३९
स्थिर मालमत्ता	Fixed Assets	१०	७४,६५,६४०.२५	७२,०८,११०.८०
इतर मालमत्ता	Other Assets	११	९७,३७,७५१.०४	९६,४०,५४१.५२
एकुण	**Total**		**९६,००,८१,५६४.५८**	**८९,१९,०५,५२२.७६**
संभाव्य देणी	Contingent Liabilities (DEAF)	१२	२३,४८,४१६.७६	१७,९१,८८६.४९
	Bills for collection and contra	१२(२)		
			९६,२४,२९,९८१.३४	८९,३६,९७,४०९.२५

श्री.अनिलकुमार रायचंद घिया
मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.रिखबचंद देविचंद बाफणा
संचालक

श्रीमती अनिता अशोकराव देशमुख
व्हा. चेअरमन

श्री.महेंद्र किसनलाल बोरा
चेअरमन

लेखा परिक्षणातील शेऱ्यास पात्र राहुन बरोबर आहे.

समवर्ती लेखा परिक्षक
मिलन सी. लुणावत अँड कंपनी
सनदी लेखापाल
फर्म रजि.नं.128571W
मिलन सी. लुणावत
पार्टनर मे.नं.१२७१९६ नाशिक

वैधानिक लेखापरिक्षक
धोंडगे पाटील गोधाणी अँड कंपनी, असोसिएटस्
चार्टर्ड अकौंटंटस्
फर्म रजि.नं. 120369W
अमोल तुकाराम देसले
पार्टनर मे.नं. १४००४०नाशिक

ANNEXURE I FORM B
Form Profit and Loss Account For the Year Ended 31st March 2026

तपशिल	Particulars	परिशिष्ट	As on 31 March 2026 (Current Year)	As on 31 March 2025 (Previous Year)
उत्पन्न	**I) Income**			
मिळालेले व्याज	Interest earned	१३	६,३९,८५,९६३.८०	५,८६,६५,६५९.००
इतर उत्पन्न	Other Income	१४	३१,६१,३५३.९९	४०,५१,२९४.०७
एकुण	**Total**		**६,७१,४७,३१७.७९**	**६,२७,१६,९५३.०७**
खर्च व तरतुदी	**II) Expenditure**			
ठेवी व कर्जावरील दिलेले व्याज	Interest expended	१५	३,७२,१८,२९९.५५	३,५९,६५,०७५.१४
व्यवस्थापकीय खर्च	Operating Expenses	१६	१,४५,५५,४७५.८२	१,३५,४३,०२५.२६
तरतुदी	Provision and contingencies	१७	४१,४४,४४०.८०	३५,३०,४२०.६५
एकुण	**Total**		**५,५९,१८,२१५.३७**	**५,३०,३८,५२१.०५**
वर्षाचा निव्वळ नफा	**Net profit for the year**		**१,१२,२९,१०१.६२**	**९६,७८,४३२.०२**
एकुण	**Total**		**६,७१,४७,३१७.७९**	**६,२७,१६,९५३.०७**
लाभांश देणे	Dividend Payable			१८,६१,६२५.००
तंत्रज्ञान विकास निधी	Technology Development Fund			१,००,०००.००
गंगाजळी निधी	Reserve Fund			२४,१९,७६५.९७
इमारत निधी	Building Fund			२४,००,०००.००
गुंतवणुक चढ उतार निधी	Investment Fluctuation Fund			२६,५८,०००.००
आपत्कालीन निधी	Emergency Fund			३९,०००.००
सभासद कल्याण निधी	Member Welfare Fund			१,००,०००.००
शिक्षण निधी	Education Fund			१,००,०००.००
एकुण	**Total**			**९६,७८,३९०.९७**

श्री.अनिलकुमार रायचंद घिया
मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.रिखबचंद देविचंद बाफणा
संचालक

श्रीमती अनिता अशोकराव देशमुख
व्हा. चेअरमन

श्री.महेंद्र किसनलाल बोरा
चेअरमन

लेखा परिक्षणातील शेऱ्यास पात्र राहुन बरोबर आहे.

समवर्ती लेखा परिक्षक
मिलन सी. लुणावत अँड कंपनी
सनदी लेखापाल
फर्म रजि.नं.128571W
मिलन सी. लुणावत
पार्टनर मे.नं.१२७१९६ नाशिक

वैधानिक लेखापरिक्षक
धोंडगे पाटील गोधाणी अँड कंपनी, असोसिएटस्
चार्टर्ड अकौंटंटस्
फर्म रजि.नं. 120369W
अमोल तुकाराम देसले
पार्टनर मे.नं. १४००४०नाशिक

परिशिष्ट १	SCHEDULE 1	As on 31 March 2026 (Current Year)	As on 31 March 2025 (Previous Year)
१. भाग भांडवल	**1. SHARE CAPITAL**		
१.१ अधिकृत भाग भांडवल	1.1 Authorized Share capital	**२,००,००,०००.००**	**२,००,००,०००.००**
१.२ वसुल भाग भांडवल	1.2 Subscribed Share Capital	१,६३,३५,९२५.००	१,५९,३५,८७५.००
आरंभी शिल्लक	Opening Balance	१,५९,३५,८७५.००	१,५४,१२,३००.००
चालु वर्षातील वाढ	Addition during the year	४,७५,०००.००	६,४२,०००.००
चालु वर्षातील घट	Deduction During the year	७४,९५०.००	१,१८,४२५.००
एकुण	**Total**	**१,६३,३५,९२५.००**	**१,५९,३५,८७५.००**

परिशिष्ट २	SCHEDULE 2	As on 31 March 2026 (Current Year)	As on 31 March 2025 (Previous Year)
२. गंगाजळी व इतर निधी	**2. RESERVES AND SURPLUS**		
२.१ गंगाजळी राखीव निधी	2.1 Statutory Reserve Fund	३,५४,८१,१८६.९७	३,२८,५७,४२८.००
आरंभी शिल्लक	Opening Balance	३,२८,५७,४२८.००	२,८९,१६,६३२.००
चालु वर्षातील वाढ	Addition during the year	२६,२३,७५८.९७	३९,४०,७९६.००
२.२ इमारत निधी	2.2 Building Fund	१,५५,००,०००.००	१,३१,००,०००.००
आरंभी शिल्लक	Opening Balance	१,३१,००,०००.००	१,०९,००,०००.००
चालु वर्षातील वाढ	Addition during the year	२४,००,०००.००	२२,००,०००.००
२.३ संशयित व बुडीत कर्ज निधी	2.3 Bad and Doubtful debts	६१,००,०००.००	६०,००,०००.००
आरंभी शिल्लक	Opening Balance	६०,००,०००.००	७१,००,०००.७०
चालु वर्षातील वाढ	Addition during the year	१,००,०००.००	१,२३,३९४.६५
चालु वर्षातील घट	Deduction During the year	०.००	१२,२३,३९५.३५
२.४ संशयित व बुडीत कर्ज निधी जिल्हा बँक शेअर्स	2.4 BDDR FOR NDCC Bank Share	१५,०००.००	१५,०००.००
आरंभी शिल्लक	Opening Balance	१५,०००.००	१५,०००.००
चालु वर्षातील वाढ	Addition during the year	०.००	०.००
२.५ गुंतवणुक चढ उतार निधी	2.5 Investment Fluctuation Fund	१,३५,५८,०००.००	१,०९,००,०००.००
आरंभी शिल्लक	Opening Balance	१,०९,००,०००.००	८२,३०,०००.००
चालु वर्षातील वाढ	Addition during the year	२६,५८,०००.००	२६,७०,०००.००
२.६ गुंतवणुक घसारा निधी	2.6 Investment Depreciation Fund	२,२४,६४,०००.००	२,२४,६४,०००.००
आरंभी शिल्लक	Opening Balance	२,२४,६४,०००.००	२,२४,६४,०००.००
चालु वर्षातील वाढ	Addition during the year	०.००	०.००
२.७ शिक्षण निधी	2.7 Education Fund	७,००,०००.००	६,००,०००.००

आरंभी शिल्लक	Opening Balance	६,००,०००.००	५,००,०००.००
चालु वर्षातील वाढ	Addition during the year	१,००,०००.००	१,००,०००.००
२.८ सभासद कल्याण निधी	2.8 Member Welfare Fund	१४,००,०००.००	१३,००,०००.००
आरंभी शिल्लक	Opening Balance	१३,००,०००.००	१२,००,०००.००
चालु वर्षातील वाढ	Addition during the year	१,००,०००.००	१,००,०००.००
२.९ सभासद भेट वस्तु निधी	2.9 Member Gift Fund	३६,००,०००.००	३६,००,०००.००
आरंभी शिल्लक	Opening Balance	३६,००,०००.००	३६,००,०००.००
चालु वर्षातील वाढ	Addition during the year	०.००	०.००
२.१० नोकर वर्ग कल्याण निधी	2.10 Staff Welfare Fund	२,००,०००.००	२,००,०००.००
आरंभी शिल्लक	Opening Balance	२,००,०००.००	२,००,०००.००
चालु वर्षातील वाढ	Addition during the year	०.००	०.००
२.११ निवडणुक निधी	2.11 Election Fund	७,०१,०००.००	७,०१,०००.००
आरंभी शिल्लक	Opening Balance	७,०१,०००.००	७,०१,०००.००
चालु वर्षातील वाढ	Addition during the year	०.००	०.००
२.१२ तंत्रज्ञान विकास निधी	2.12 Technology Development Fund	१५,००,०००.००	१४,००,०००.००
आरंभी शिल्लक	Opening Balance	१४,००,०००.००	१३,००,०००.००
चालु वर्षातील वाढ	Addition during the year	१,००,०००.००	१,००,०००.००
२.१३ उत्तम जिंदगीवरील तरतुद	2.13 Standard Asset Provision	१४,००,०००.००	१२,००,०००.००
आरंभी शिल्लक	Opening Balance	१२,००,०००.००	१०,००,०००.००
चालु वर्षातील वाढ	Addition during the year	२,००,०००.००	२,००,०००.००
२.१४ आपत्कालीन निधी	2.14 Emergency Fund	२,००,०००.००	१,६१,०००.००
आरंभी शिल्लक	Opening Balance	१,६१,०००.००	१,३५,०००.००
चालु वर्षातील वाढ	Addition during the year	३९,०००.००	२६,०००.००
२.१५ बँक ऑफ महाराष्ट्र चेक तरतुद	2.15 Bank Of Maha Cheque Provision	३,६५,०००.००	३,६५,०००.००
आरंभी शिल्लक	Opening Balance	३,६५,०००.००	३,६५,०००.००
चालु वर्षातील वाढ	Addition During the year	०.००	०.००
२.१६ एन.पी.ए २०२४	2.16 NPA 2024	१२,२३,३९५.३५	१२,२३,३९५.३५
आरंभी शिल्लक	Opening Balance	०.००	०.००
चालु वर्षातील वाढ	Addition During the year	०.००	१२,२३,३९५.३५
२.१७ नफा व तोटा	2.17 profit and loss	१,१२,२९,७७४.५१	९६,७९,०६३.८६
चालु वर्षाचा नफा	Current year profit	१,१२,२९,१०१.६२	९६,७८,४३२.०२
संचित नफा	Accumulated Profit	६७२.८९	६३१.८४
एकुण	**Total**	**११,५६,३७,३५६.८३**	**१०,५७,६५,८८७.२१**

परिशिष्ट ३	SCHEDULE 3	As on 31 March 2026 (Current Year)	As on 31 March 2025 (Previous Year)
३. ठेवी	**3. DEPOSITS**		
३.१ चालु ठेव खाते	3.1 Current Deposits	१,७१,२५,१९०.३०	१,२६,५६,६१५.६३
३.२ बचत बँक ठेव खाते	3.2 Saving Deposits	३४,३२,२९,३७४.८०	२९,५१,६२,६४८.३२
३.३ मुदत ठेव खाते	3.3 Term Deposits	४६,१८,१०,४१७.००	४५,६६,३६,८५३.००
३.४ मुदत बार ठेवी व हायपोथिकेशन बॅलन्स	3.4 Other Deposits	०.००	५७,११८.००
एकुण	**Total**	**८२,२१,६४,९८२.१०**	**७६,४५,१३,२३४.९५**

परिशिष्ट ४	SCHEDULE 4	As on 31 March 2026 (Current Year)	As on 31 March 2025 (Previous Year)
४. घेतलेली कर्ज	**4. BORROWINGS**		
४.१ भारतातील घेतलेले कर्ज	4.1 Borrowing in India	०.००	०.००
४.२ घेतलेले इतर कर्ज	4.2 Other Borrowing	०.००	०.००
एकुण	**Total**	**०.००**	**०.००**

परिशिष्ट ५	SCHEDULE 5	As on 31 March 2026 (Current Year)	As on 31 March 2025 (Previous Year)
५. इतर देणी व तरतुदी	**5.OTHER LIABILITIES & PROVISIONS**		
५.१ व्याज देणे	5.1 Interest Payable	७६,७७१.६९	२०,७४८.१४
५.२ देय लाभांश	5.2 Dividend Payable	१,७६,५४९.००	२,१५,३११.००
५.३ जीएसटी देणे	5.3 GST Payable	०.००	०.००
५.४ ऑडिट फी	5.4 Audit fee	३,९९,५२२.९६	४,१३,०५८.४६
५.६ धनको	5.6 Sundry Creditor	२०,४८,११०.००	२१,०३,९३१.००
५.८ वसुल न झालेले व्याज	5.8 Overdue interest reserve	३२,४२,३४७.००	२९,३७,४७७.००
एकुण	**Total**	**५९,४३,३००.६५**	**५६,९०,५२५.६०**

परिशिष्ट ६	SCHEDULE 6	As on 31 March 2026 (Current Year)	As on 31 March 2025 (Previous Year)
६. रोख व रिझर्व्ह बँकेतील शिल्लक	**6. Cash & Balances with RBI, SBI**		
६.१ रोख व रिझर्व्ह बँकेतील शिल्लक	6.1 Cash In Hand with RBI, SBI	०.००	०.००
६.२ रोख शिल्लक	6.2 Cash in hand	८८,११,०००.००	१,७०,६१,०००.००
एकुण	**Total**	**८८,११,०००.००**	**१,७०,६१,०००.००**

परिशिष्ट ७	SCHEDULE 7	As on 31 March 2026 (Current Year)	As on 31 March 2025 (Previous Year)
७. इतर बँकामधील शिल्लक व मुदत ठेवी	**7. Balances with banks and Money at call short notice**		
७.१ बँकेतील रोख शिल्लक	7.1 Bank Balance	४,२९,०२,६१९.७८	२,०२,११,१८२.०५
७.२ मुदत ठेव	7.2 Fix Deposit	८,६९,०६,२१२.००	१०,६३,३६,३००.००
एकुण	**Total**	**१२,९८,०८,८३१.७८**	**१२,६५,४७,४८२.०५**

परिशिष्ट ८	SCHEDULE 8	As on 31 March 2026 (Current Year)	As on 31 March 2025 (Previous Year)
८. गुंतवणुक	**8.INVESTMENT**		
८.१ केंद्र सरकारचे व राज्य सरकारचे रोखे	8.1 Government Securities	३८,१२,१२,०००.००	३८,१२,१२,०००.००
८.२ सहकारी संस्थांचे भाग	8.2 Co-Operative Societies Shares	१६,०००.००	१६,०००.००
८.३ म्युच्युअल फंड	8.3 Mutual fund	०.००	०.००
एकुण	**Total**	**३८,१२,२८,०००.००**	**३८,१२,२८,०००.००**

परिशिष्ट ९	SCHEDULE 9	As on 31 March 2026 (Current Year)	As on 31 March 2025 (Previous Year)
९. कर्ज	**9. ADVANCES**		
९.१ अल्प मुदत कर्ज	**9.1 Short term loan**		
नजरगहाण कर्ज	Hypothecation	५,४८,२१,१५८.४०	४,४१,६७,४१८.८०
सोनेतारण कर्ज	Gold loan	१२,०६,३२,२४२.००	८,९१,६९,७८९.००
सोनेतारण लिमिट कर्ज	Gold loan CC	५९,९५,२८४.००	८७,०६,०५८.००
मुदत ठेव तारण कर्ज	Advance Against Fixed Deposit	१,६६,५६,८५०.००	१,२९,७२,५७५.००
कॅशक्रेडिट कर्ज	Cash Credit loan	१५,०००.००	२४,८३१.००
वेअरहाऊस कर्ज	Warehouse loan	२६,५५,६८७.२०	१,२४,७६,८५८.००
कॅशक्रेडिट हप्तेबंदी कर्ज	Cash Credit Installment Loan	११,५७,५७७.००	११,१४,३६९.००
एलआयसी पॉलीसी तारण कर्ज	LIC Policy loan CC	७,२१,५४३.००	१४,७४,८९६.००
स्थावर तारण मिळकत सी.सी. कर्ज	Property Against CC Loan	२,२१,७५,५८३.९१	२,२३,४८,१४८.५९

९.२ मध्यम मुदत कर्ज	**9.2 Medium Term Loan**		
हायरपरचेस कर्ज	Hire Purchases Loan	८,२७,३५,१९६.००	६,१५,४९,३९३.००
नजरगहाण हप्तेबंदी कर्ज	Hypothecation Installment Loan	२,१०,०४,८६१.००	१,८६,०५,५०५.००
सेवक कर्ज	Staff Loan	३,८६,६९७.००	१,७०,६४२.००
स्थावर तारण मिळकत हप्तेबंदी कर्ज	Property Against Instalment Loan	५,५३,६७,५२९.००	४,७४,६०,१६७.००
९.३ दीर्घ मुदत कर्ज	**9.3 Long Term Loan**		
गृहतारण कर्ज	Housing Loan	३,८७,०५,१३३.००	२,९९,७९,७३८.००
एकुण	**Total**	**४२,३०,३०,३४१.५१**	**३५,०२,२०,३८८.३९**

परिशिष्ट १०	**SCHEDULE 10**	**As on 31 March 2026 (Current Year)**	**As on 31 March 2025 (Previous Year)**
१०. स्थिर मालमत्ता	**10. FIXED ASSETS**		
१०.१ जमीन व इमारत	10.1 Land & Building	३०,४८,०४४.००	३१,२६,१९९.००
आरंभी शिल्लक	Opening Balance	३१,२६,१९९.००	३२,०६,३५८.००
चालु वर्षातील वाढ	Addition During the year	०.००	०.००
चालु वर्षातील घट	Deduction During the year	०.००	०.००
घसारा	Depreciation	७८,१५५.००	८०,१५९.००
१०.२ फर्निचर व साहित्य	10.2 Furniture & Fixtures	४४,१५,७२२.११	४०,७९,८२९.४२
आरंभी शिल्लक	Opening Balance	४०,७९,८२९.४२	४६,६६,६२८.७१
चालु वर्षातील वाढ	Addition During the year	१२,६८,५०७.१२	१,०७,८३१.५०
चालु वर्षातील घट	Deduction During the year	०.००	०.००
घसारा	Depreciation	९,३२,६१४.४३	६,९४,६३०.७९
१०.३ वाचनालय	10.3 Library	१,८७४.१४	२,०८२.३८
आरंभी शिल्लक	Opening Balance	२,०८२.३८	२,३१३.७६
चालु वर्षातील वाढ	Addition During the year	०.००	०.००
चालु वर्षातील घट	Deduction During the year	०.००	०.००
घसारा	Depreciation	२०८.२४	२३१.३८
एकुण	**Total**	**७४,६५,६४०.२५**	**७२,०८,११०.८०**

परिशिष्ट ११	SCHEDULE 11	As on 31 March 2026 (Current Year)	As on 31 March 2025 (Previous Year)
११. इतर मालमत्ता	**11. OTHER ASSETS**		
स्टॅम्प	Adhesive Stamp	५००.००	३,६००.००
छपाई, स्टेशनरी साठा	Printing Stock	०.००	४५,४११.००
डिपॉझिट (टेलिफोन, लाईट)	Deposits	२१,८५०.००	२१,८५०.००
ऋणको	Sundry Debtors	९,२५,९३८.०५	१०,५३,०३४.०५
एम.एस.ई.डी कमिशन	MSED Commission	२८,६६०.८५	२८,६६०.८५
आगाऊ लॉकर भाडे	Locker Rent in Advance	०.००	०.००
जीएसटी येणे	GST Receivable	४,६६,८५६.५९	२,४२,७२७.०७
पैकी उत्पन्नक्षम नसलेल्या कर्जावरील दुबेरजी	Interest Received on NPA	३२,४२,३४७.००	२९,३७,४७७.००
गुंतवणुकीवरील व्याज	Interest Received on Investment	४६,३२,७४०.५५	४८,८८,८४६.५५
इतर मालमत्ता	Other Asset	४,१८,८५८.००	४,१८,९३५.००
एकुण	**Total**	**९७,३७,७५१.०४**	**९६,४०,५४१.५२**

परिशिष्ट १२	SCHEDULE 12	As on 31 March 2026 (Current Year)	As on 31 March 2025 (Previous Year)
संभाव्य देणी	**CONTINGENT LIBILITIES**		
सेव्हिंग बँक ठेव	Saving A/c	२३,१२,२९१.०२	१७,५५,७६०.७५
चालू खाते	Current A/c	३६,१२५.७४	३६,१२५.७४
एकुण	**Total**	**२३,४८,४१६.७६**	**१७,९१,८८६.४९**

परिशिष्ट १३	SCHEDULE 13	As on 31 March 2026 (Current Year)	As on 31 March 2025 (Previous Year)
१३. मिळालेले व्याज	**13. Interest Earned**		
१३.१ कर्जावरील व्याज	13.1 Interest on Loan	३,८५,१७,६८०.००	३,२२,६१,३१३.००
१३.२ गुंतवणुकीवरील व्याज	13.2 Interest on Investment	१९,४५,७२९.८०	२८,८१,७९२.००
१३.३ सरकारी रोख्यावरील व्याज	13.3 Interest on Gov. Securities	२,३५,२२,५५४.००	२,३५,२२,५५४.००
एकुण	**TOTAL**	**६,३९,८५,९६३.८०**	**५,८६,६५,६५९.००**

परिशिष्ट १४	SCHEDULE 14	As on 31 March 2026 (Current Year)	As on 31 March 2025 (Previous Year)
इतर उत्पन्न	**14. Other Income**		
सरकारी रोखे व्यवहारातुन मिळालेले उत्पन्न	Profit on sale of Investment	०.००	०.००
म्युच्युअल फंडावरील मिळालेले उत्पन्न	Profit On Mutual Fund	२४,७८,३०९.५१	३३,७७,३८९.७३
कमिशन व वटाव	Commission and Brokerage	१,३७,३१९.८२	१,५४,३६७.३४
लॉकर भाडे	Locker Rent	१,१९,४२६.५६	१,०८,९६०.५०
सर्व्हिस चार्जेस	Service Charges	१,४८,५१७.९०	१,१९,६४८.९०
कस्टडी चार्जेस	Custody charges	१,७७,३८२.१०	१,८१,०८९.३०
भागावरील लाभांश	Dividend on shares	१००.००	१००.००
कर्ज प्रक्रिया शुल्क	loan Processing fees	९९,८७७.९६	१,०९,५६८.८२
इतर उत्पन्न	Other Income	४२०.१४	१६९.४८
एकुण	**Total**	**३१,६१,३५३.९९**	**४०,५१,२९४.०७**

परिशिष्ट १५	SCHEDULE 15	As on 31 March 2026 (Current Year)	As on 31 March 2025 (Previous Year)
१५. दिलेले व्याज	**15. INTEREST EXPENDED**		
१५.१ ठेवीवर दिलेले व्याज	15.1 Interest on Deposits	३,७२,१८,२९९.५५	३,५९,६५,०७५.१४
१५.२ कर्जावर दिलेले व्याज	15.2 Interest on loan/borrowings	०.००	०.००
एकुण	**Total**	**३,७२,१८,२९९.५५**	**३,५९,६५,०७५.१४**

परिशिष्ट १६	SCHEDULE 16	As on 31 March 2026 (Current Year)	As on 31 March 2025 (Previous Year)
१६. व्यवस्थापकीय खर्च	**16. OPERATING EXPENSES**		
सेवक पगार, भत्ते प्रा. फंड इ.	Salaries & Allowances	६८,५०,८२३.००	६६,९०,६१६.००
संचालक मंडळ सभा भत्ते	Directors Meeting Allowances	५०,६२५.००	५६,६२५.००
भाडे, कर, विज,	Rent, taxes and Lighting	७,४१,८५०.००	१०,३६,०३९.००
विमा हप्ता	Insurance Premium	१२,७४,०१५.२८	१०,९२,५२३.९०
कायदे सल्ला व कोर्ट कारवाई खर्च	Law Charges	०.००	२०,०००.००

टपाल, तार, दुरध्वनी इतर	Postages telegrams & Telephone etc.	३,९७,०५२.७४	३,७२,६८५.९८
दुरुस्ती व देखभाल	Repairs & Maintenance	२,९८,३३६.९६	२,१२,५७०.५०
मालमत्ता झीज	Depreciation on Assets	९,९४,०८२.६७	७,७५,०२१.१७
छपाई, स्टेशनरी व जाहिरात	Advertisement, Stationery & Printing	३,२५,४९३.९९	३,८३,२३२.९६
सहकारी संस्था वर्गणी	Co-Op Inst Member Fees	७०,८५०.००	६८,६७०.००
ॲडमिनीस्ट्रेटिव्ह चार्जेस	Administrative Charges Charges	२७,८४३.००	२६,३१७.००
ऑडिट फी	Audit fees	४,३५,५००.००	३,५७,४४०.००
सेवक ग्रॅच्युईटी	Staff Gratuity	४,६२,६१९.००	३,००,०००.००
सेवक रजा विक्री	Staff Leave Salary	६,७४,१९२.००	४,०३,७२९.००
सेवक बोनस	Staff Bonus	७,८९,३२३.००	६,४१,०२५.००
सेवक क्लोसिंग अलौंस	Staff Closing Allowance	८,६००.००	२५,५५०.००
प्रशिक्षण खर्च	Training Expenses	२४,९६१.००	२२,८९०.००
जीएसटी	GST Paid	४३,२००.००	१९,६७२.००
व्यावसायिक खर्च	Professional Fees	५,५००.००	६,०००.००
इतर खर्च	Other charges	९,९७,००१.२८	१०,०७,९८८.८८
कमिशन अदा	Commission paid	८३,६०६.९०	२४,४२८.८७
एकुण	**Total**	**१,४५,५५,४७५.८२**	**१,३५,४३,०२५.२६**

परिशिष्ट १७	**SCHEDULE 17**	**As on 31 March 2026 (Current Year)**	**As on 31 March 2025 (Previous Year)**
१७.तरतुदी	**17. PROVISIONS CONTINGENCIES EXPENSES**		
आयकर तरतुद	Provision for income tax	३,००,०००.००	२,०६,९४९.००
आगाऊ आयकर तरतुद	Provision for income tax Advance	३५,४४,३६३.८०	३०,००,०००.००
उत्तम जिंदगीवरील तरतुद	Standard Asset Provision	२,००,०००.००	२,००,०००.००
सरकारी रोख्यांवरील जादा हप्ता	Excess premium on GOI	७७.००	७७.००
संशयित व बुडीत कर्ज निधी	Bad and Doubtful debts	१,००,०००.००	१,२३,३९४.६५
एकुण	**Total**	**४१,४४,४४०.८०**	**३५,३०,४२०.६५**

- सन २०२६-२०२७ सालासाठीचे अंदाजपत्रक -

(आकडे रु. लाखात)

अ. नं.	जमेची बाजू तपशील	सन २०२५-२०२६ चा अंदाज	सन २०२५-२०२६ प्रत्यक्ष जमा	सन २०२६-२०२७ चा अंदाज
१.	कर्जावर मिळणारे व्याज	३६५.००	३८५.१८	४५०.००
२.	गुंतवणूकीवर मिळणारे व्याज	२५.००	१९.४६	२०.००
३.	कमिशन	२.००	१.३७	२.००
४.	किरकोळ उत्पन्न	६.००	५.४५	६.००
५.	सरकारी रोखे वरील व्याज	२२८.००	२३५.२३	२३०.००
६.	सरकारी रोखे खरेदी विक्रीतुन मिळालेले उत्पन्न	५.००	–	५.००
७.	म्युच्युअल फंडावरील नफा	३५.००	२४.७८	२५.००
	एकुण:	**६६६.००**	**६७१.४७**	**७३८.००**

अ. नं.	खर्चाची बाजू तपशील	सन २०२५-२०२६ चा अंदाज	सन २०२५-२०२६ प्रत्यक्ष खर्च	सन २०२६-२०२७ चा अंदाज
१.	ठेवीवर द्यावे लागणारे व्याज	३७५.००	३७२.१८	४१५.००
२.	पगार, भत्ते, प्रॉ. फंड, बोनस, ग्रॅज्युईटी	८०.००	८७.८३	९०.००
३.	संचालक मंडळ भत्ते	१.००	०.५१	१.००
४.	भाडे, कर, विमा	२२.००	२०.१६	२५.००
५.	न्यायालयीन खर्च व ॲडमिनिस्ट्रेटिव्ह चार्जेस	१.००	०.२८	१.००
६.	पोस्टेज, तार व टेलीफोन	४.००	३.९७	५.००
७.	ऑडीट फी	४.००	४.३६	५.००
८.	छपाई, स्टेशनरी व जाहिरात इ.	४.००	३.२५	४.००
९.	बुडीत संशयित कर्ज निधी	१.००	१.००	१.००
१०.	उत्पादक कर्जावरील तरतुद	२.००	२.००	२.००
११.	इतर खर्च			
	सहकारी संस्था वर्गणी	०.७०	०.७१	०.७५
	सेवक वर्ग प्रवास भत्ता	०.२०	०.०३	०.२०
	किरकोळ खर्च	१२.००	११.४८	१३.००
	सोने मूल्यमापन शुल्क	०.००	–	१.००
	व्यावसायिक फी	१.००	०.०६	४.००
१२.	घसारा व दुरुस्ती	१०.००	१२.९२	२०.००
१३.	आयकरापुर्वीचा नफा	(१४८.१०)	(१५०.७३)	(१५०.०५)
१४.	आयकर	४४.४३	३८.४४	३९.००
१५.	अपेक्षीत नफा	१०३.६७	११२.२९	१११.०५
	एकुण	**६६६.००**	**६७१.४७**	**७३८.००**

- सभासदांना नम्र निवेदन -

१. आपला पत्ता व मोबाईल क्रमांक बदलला असल्यास त्वरीत बँकेस कळवावा.
२. आपल्या वारसाची नोंद करुन द्यावी. त्यामुळे पुढील व्यवहार सुरळीत होतात.
३. आपले सर्व ठेव खाते व कर्ज खाते नियमाप्रमाणे चालु ठेवा, कर्जाचे व्याज व हफ्ते दरमहा भरा तसेच कर्ज परत फेडीची तारीख लक्षात ठेवा.
४. कर्जदारांना फक्त जामीन होऊ नका तर कर्जदार नियमित व वेळेवर कर्ज भरतो किंवा नाही याकडेही लक्ष ठेवा.
५. बँकेत आपल्या खात्यावर पुरेशी रक्कम जमा ठेवुनच खात्यावरील चेक द्या. अन्यथा चेक रकमे अभावी परत गेल्यास बँकेस कमीपणा आणणारे व आपणास कार्यवाहीत तोंड द्यावे लागेल.
६. आपण आपली स्वत: ची बँक समजुन सहकार्य करा व परस्पर प्रगती साधा.
७. प्रतिवर्षाचा लाभांश बँकेतील आपल्या खाती जमा करणेसाठी बँकेत आपले सेव्हींग/चालु ठेव खाते उघडून त्याचा तपशील बँकेच्या कार्यालयाकडे द्यावा.
८. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार प्रत्येक खातेदाराने त्याचा खात्यावर व्यवहार करावा अन्यथा १० वर्षे ज्या खात्यावर व्यवहार होणार नाही अशा खात्यातील सर्व प्रकारच्या ठेवींची रक्कम भारतीय रिझर्व्ह बँकेला जमा करण्यात येते.
९. बँकेने RTGS, NEFT, ATM, UPI, IMPS, SMS सुविधा, CTS सी.टी.एस. चेक क्लिअरींग सुविधा, पर्सनलाईज चेक बुक सुविधा, लॉकर व वीज बिल भरणा या सुविधा उपलब्ध केलेल्या आहे. सदर सुविधांचा सभासद व खातेदारांनी लाभ घ्यावा.
१०. सभासदांनी के.वाय.सी. नॉर्म्सची पुर्तता केलेली नसेल त्यांनी आपला अद्यावत फोटो, फोटो आयडी, पॅनकार्ड व आधारकार्डाची झेरॉक्स प्रत बँकेत जमा करावी.
११. ज्या सभासदांनी अद्याप शेअर्स सर्टीफीकेट नेलेले नसतील त्यांनी बँकेत येवुन शेअर्स सर्टीफीकेट घेवून जाणे.

-दि डिपॉझिट एज्युकेशन ॲण्ड अवेअरनेस फंड स्कीम २०१४-

रिझर्व्ह बँक परिपत्रक DBOD.No.DEAF.Cell.B.C.114/30.01.002/2013-14 Dated May 27, 2014 अन्वये बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ चे कलम २६ (अ) अंतर्गत दि डिपॉझिट एज्युकेशन अँण्ड अवेअरनेस फंड स्कीम २०१४ नुसार सर्व बँकांना लागु केलेने ज्या ठेवी खात्यावर १० वर्षापेक्षा जास्त कालावधीत व्यवहार झालेले नाहीत किंवा ज्या ठेव किंवा अन्य जमा रक्कमेची १० वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊनही संबंधीतांकडून मागणी झालेली नाही. अशा प्रकारच्या रक्कमा रिझर्व्ह बँकेकडील DEAF खाती वर्ग करणे बंधनकारक आहे. तरी संबधित खातेदारांनी याची नोंद घेऊन आपले खातेवर व्यवहार करणेची दक्षता घ्यावी.

- क्रियाशील सभासद होणेसाठी पात्रता निकष-

१ सभासदांने कमीत कमी रु १०००/– चे भाग धारण करावे.
२. सभासदाने अगोरदच्या सलग ५ वर्षामध्ये किमान एक वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहावे.
३. सभासदांनी किमान रु ३०००/– ची ठेव (मुदत ठेव, सेव्हींग, करंट इ.) किमान १ वर्ष बँकेत ठेवली पाहीजे किंवा जो सभासद मागील २ वर्षापासुन बँकेच्या कोणत्याही प्रकारच्या कर्ज सवलतीची किमान रु ५००००/– ची मंजुर सुविधा वापरत आहे.
४. सभासद थकबाकीदार झाल्यास सभासदाचे नांव मतदार यादीमध्ये येणार नाही.
५. सर्व सभासदांनी केवायसी पुर्तता करणे आवश्यक आहे.

- ठेवी व कर्जावरील व्याजाचे आकर्षक दर -

ठेवी प्रकार	व्याजाचा दर द.सा.द.शे.रु.
बचत खाते	३.२५%
मुदत ठेवी	
१६ दिवस ते ४५ दिवस	३.५०%
४६ दिवस ते ९० दिवस	४.००%
९१ दिवस ते १८० दिवस	४.५०%
१८१ दिवस ते ३६४ दिवस	५.५०%
१२ महिन्याचा पुढे	६.००%
परिस ठेव योजना ५११ दिवस व्याजदर ६.७५%	
सेव्हींग्ज खाते किमान शिल्लक रक्कम रु ३००/- चालु खाते किमान शिल्लक रक्कम रु १०००/- मुदत ठेवीवर ज्येष्ठ नागरिकांस ०.५०% जादा व्याज	

कर्जाचे प्रकार	व्याज दर
हायरपर्चेस (नविन वाहने)	१०.५०%
हायरपर्चेस (जुने वाहने)	१३.००%
सोनेतारण कर्ज	९.५०%
नजरगहाण हफ्तेबंदी कर्ज	११.५०%
कॅश क्रेडीट हफ्तेबंदी कर्ज	१५.००%
प्रॉपर्टी अगेन्स्ट सीसी/हफ्तेबंदी कर्ज	११.५०%
स्टॉफ लोन	१०.००%
कॅशक्रेडीट कर्ज	१२.००%
नजरगहाण कर्ज	११.५०%
हाऊसिंग कर्ज	९.७५%
वेअरहाऊस कर्ज	११.००%
वैयक्तीक कर्ज	१५.००%
एलआयसी पॉलीसी अगेन्स्ट सीसी कर्ज	१०.००%
एलआयसी पॉलीसी टर्म लोन कर्ज	१०.००%
नियमाप्रमाणे व्यवहार केल्यास सोनेतारण, वेअरहाऊस व कॅशक्रेडीट हफ्तेबंदी कर्ज वगळता रिबेट ०.५०% आणि एलआयसी पॉलीसी अगेन्स्ट कर्जाला १.००%	



खातेदार/ग्राहकांसाठी केवायसी (KYC) पुर्तता जाहीर सुचना

रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार खात्यावरील व्यवहारानुसार खात्याचे उच्च, मध्यम व अल्प जोखीम असे वर्गीकरण केले जाते व त्यानुसार खातेदारांनी दर २ वर्ष, ८ वर्ष, १० वर्षांनी केवायसी (KYC) ची पुर्तता करुन द्यायची असते. बँकेच्या शाखांमार्फत खातेदारांकडे केवायसी (KYC)/ री-केवायसी (Re-KYC) ची पुर्तता करणेबाबत वारंवार पाठपुरावा केला जात आहे. जे खातेदार केवायसी (KYC)/ री-केवायसी (Re-KYC) ची पुर्तता करुन देत नाहीत अश्या खात्यांचे व्यवहार प्रतीबंधीत केले जातात.

सबब बँकेच्या सर्व खातेदारांना/ग्राहकांना या सुचनेद्वारे कळविण्यात येते की, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या निर्देशानुसार व मार्गदर्शक सुचनेनुसार आपणांस शेवटची संधी म्हणुन ज्या खातेदारांनी/ग्राहकांनी अद्यापपावेतो आपल्या खात्यासाठी केवायसी (KYC) पुर्तता केली नाही अशा सर्व खातेदारांनी/ग्राहकांनी केवायसी (KYC) साठी लागणाऱ्या कागदपत्रांची (रेशनकार्ड/रहिवाशी दाखला/लाईट बील/ टेलीफोन बील यापैकी एक पॅनकार्ड, आधारकार्ड, रंगीत फोटो) त्वरीत पुर्तता करुन द्यावी.

- बँकेचा सेवक वर्ग -		
अ.नं.	कर्मचाऱ्याचे नांव	हुद्दा
१.	श्री. घिया अनिलकुमार रायचंद	मुख्य कार्यकारी अधिकारी
२.	श्री. शेटे प्रितम राजेंद्र	शाखाधिकारी वणी शाखा
३.	श्री. गायकवाड दिलीप केशव	शाखाधिकारी दिंडोरी शाखा
४.	श्री. कंसारा प्रथमेश इंद्रकुमार	शाखाधिकारी पंचवटी शाखा
५.	श्री. शेवाळे हेमंतकुमार रामदास	IT अधिकारी
६.	कु. पगारीया शिवानी भिकचंद	अधिकारी
७.	कु. देवरे रितीका भरत	अधिकारी
८.	श्री. आहेर बापु दगा	कॅशिअर
९.	श्री. धात्रक किरण माधव	कॅशिअर
१०.	सौ. शेटे सायली प्रितम	कॅशिअर
११.	श्री. खनाळे स्वराज शामराव	क्लार्क
१२.	कु. गायकवाड प्रज्ञा भाऊसाहेब	क्लार्क
१३.	श्री. पवार ज्ञानेश्वर निंबा	शिपाई
१४.	श्री. गवळी राजु वसंत	शिपाई
१५.	श्री. जाधव तात्यासाहेब मधुकर	शिपाई
१६.	श्री. पाटील स्वप्नील राजेंद्र	शिपाई

सुरक्षित बँकिंग व्यवहार करण्यासाठी सुचना

१. आपल्या खात्यावर जमा नावे होणाऱ्या व्यवहाराची माहिती मोबाईलवर एसएमएस अलर्टद्वारे कळविली जाईल. तसेच आपल्या खात्याचे स्टेटमेंट आपल्या ई-मेल वर पाठविणेसाठी आपण आपला मोबाईल नं. व ई-मेल ड्रेस आपले खाते ज्या शाखेत आहे त्या शाखेत द्यावा.

२. बँकेतुन पैसे काढताना पासबुक भरुन घेऊन खात्यावरील व्यवहारांचा मेळ द्या.

३. आपले पासबुक किंवा चेकबुक गहाळ झाल्यास ताबडतोब बँकेला माहिती द्या.

४. आपली ठेव ठेवतांना वारस नोंद करा व पुढील अडचणींपासुन निश्चित रहा.

५. कर्जाचे हफ्ते व इतर चार्जेस वेळेत भरा व व्याजावरील व्याज वाचवा.

६. आपला पत्ता बदलला असल्यास त्याची माहिती त्वरीत बँकेस द्या.

७. रिझर्व्ह बँकेच्या सुचनांप्रमाणे सर्व खातेदारांची के. वा. सी. पुर्तता असणे अत्यावश्यक आहे. तरी खातेदारांनी शाखेत भेट देऊन आपली के. वाय. सी. पुर्तता असल्याची खात्री करुन घ्यावी.

८. व्यक्तीगत नवीन खाते उघडणेसाठी आवश्यक कागदपत्रे (के.वा.सी) फोटो-२ लेटेस्ट (आय कार्ड साईज), पत्ता व ओळख पुरावा, आधार कार्ड, पॅन कार्ड.

* पोटनियम दुरुस्तीचा मसुदा *

अ. क्र.	पोटनियम क्रमांक	सध्याच्या पोटनियमाची शब्दरचना	सुचविलेली दुरुस्ती	दुरुस्ती नंतर होणाऱ्या पोटनियमाची शब्द रचना	पोटनियम दुरुस्तीचे कारण
१.	५५.	**भाग भांडवलाचे कर्जाशी प्रमाण**		**भाग भांडवलाचे कर्जाशी प्रमाण**	
		कर्जदार सभासदांसाठी भाग भांडवलाचे कर्जाशी प्रमाण पुढील प्रमाणात राहील. १. विनातारणी कर्जासाठी कर्ज रकमेच्या ५% पर्यंत. २. तारणी कर्जासाठी कर्ज रकमेच्या २.५% पर्यंत. ३. लघु उद्योग धंद्यासाठी एकुण २.५% पैकी सुरुवातीस कर्ज रकमेच्या १% पर्यंत व उर्वरित १.५% पुढील दोन वर्षात घेता येईल. तथापि कोणत्याही सभासदाला बँकेच्या भाग भांडवलाच्या १/५ इतकी रक्कम जास्तीत जास्त घेता येईल. तथापि रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी यामध्ये बदल केल्यास ते कर्जदारावर बंधनकारक राहतील. तथापि भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण १२% पेक्षा जास्त राहिल्यास रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार तारणी कर्जाच्या बाबतीत हे प्रमाण बँक बदलु शकेल.	कोणत्याही सभासदाला भाग भांडवलाच्या ५% इतकी रकमे पर्यंत भाग जास्तीत जास्त घेता येईल.	कर्जदार सभासदांसाठी भाग भांडवलाचे कर्जाशी प्रमाण पुढील प्रमाणात राहील. १. विनातारणी कर्जासाठी कर्ज रकमेच्या ५% पर्यंत. २. तारणी कर्जासाठी कर्ज रकमेच्या २.५% पर्यंत. ३. लघु उद्योग धंद्यासाठी एकुण २.५% पैकी सुरुवातीस कर्ज रकमेच्या १% पर्यंत व उर्वरित १.५% पुढील दोन वर्षात घेता येईल. तथापि कोणत्याही सभासदाला बँकेच्या भाग भांडवलाच्या ५% इतकी रक्कम जास्तीत जास्त घेता येईल. तथापि रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी यामध्ये बदल केल्यास ते कर्जदारावर बंधनकारक राहतील. तथापि भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण १२% पेक्षा जास्त राहिल्यास रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार तारणी कर्जाच्या बाबतीत हे प्रमाण बँक बदलु शकेल.	रिझर्व्ह बँकेच्या परीपत्रका प्रमाणे
२.	६१.	**पोटनियमाची दुरुस्ती**		**पोटनियमाची दुरुस्ती**	
		१. पोटनियमातील कोणत्याही कलमामध्ये बदल करण्यासाठी किमान १४ दिवसांची पूर्वसुचना सभासदांना देणे आवश्यक आहे. २. पोटनियमातील कोणत्याही कलमामध्ये बदल, दुरुस्ती, वाढ अगर रद्द करण्यासाठी सभेमध्ये एकुण हजर व मतदान करणाऱ्या २/३ सभासदांचे बहुमत आवश्यक राहील. त्याशिवाय कोणतीही दुरुस्ती करता येणार नाही. ३. उपरोक्त मंजुर झालेल्या पोटनियमांची अंमलबजावणी निबंधकाची लेखी मंजुरी आलेल्या तारखेपासून होईल.	पोटनियम दुरुस्ती पूर्व रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया यांची पूर्व परवानगी घेणे.	१. पोटनियम दुरुस्ती पूर्वी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांची पूर्व परवानगी (नाहारकत दाखला) घेणे आवश्यक. २. पोटनियमातील कोणत्याही कलमामध्ये बदल करण्यासाठी किमान १४ दिवसांची पूर्वसुचना सभासदांना देणे आवश्यक आहे. ३. पोटनियमातील कोणत्याही कलमामध्ये बदल, दुरुस्ती, वाढ अगर रद्द करण्यासाठी सभेमध्ये एकुण हजर व मतदान करणाऱ्या २/३ सभासदांचे बहुमत आवश्यक राहील. त्याशिवाय कोणतीही दुरुस्ती करता येणार नाही. ४. उपरोक्त मंजुर झालेल्या पोटनियमांची अंमलबजावणी निबंधकाची लेखी मंजुरी आलेल्या तारखेपासून होईल.	बँकिंग नियमन कायदा१९४९ (AACS) मधील अलीकडील दुरुस्ती



कॉसमॉस बँक व ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशन यांचे यांच्यातर्फे महाराष्ट्रातील उत्कृष्ट सहकारी बँक पुरस्कार हा पुरस्कार मा.श्री.बाबासाहेब पाटील, सहकार मंत्री (महाराष्ट्र राज्य), मा.श्री.डॉ. संजयजी कोलते, सहकार आयुक्त, मा.श्री.प्रल्हादजी कोकरे, अध्यक्ष कॉसमॉस बँक, मा.श्री. विद्याधर अनास्कर, प्रशासक राज्य सहकारी बँक लि. मुंबई पुरस्कार वितरक मा.श्री.सिए.मिलिंदजी काळे, अध्यक्ष,बोर्ड ऑफ मॅनेजमेंट कॉसमॉस बँक यांच्या शुभहस्ते बँकेचे अध्यक्ष श्री.महेंद्रजी बोरा यांना प्रदान करण्यात आला. याप्रसंगी बँकेचे संचालक श्री.सुभाषजी खाबिया, हिदायतजी मुल्ला, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.अनिलकुमार घिया उपस्थित होते.



दि महाराष्ट्र अर्बन को ऑप बँक्स फेडरेशन लि. मुंबई यांचे तर्फे युनिट बँक व १०० ठेवी असलेली सर्वत्कृष्ट बँक पुरस्कार प्रमुख अतिथी NABCUB चे अध्यक्ष मा. जोतिन्द्रजी मेहता फडरेशनचे अध्यक्ष मा.श्री.अजयजी ब्रह्मेचा,उपाध्यक्ष मा. सौ. वैशालीताई आवाडे, मुंबो बँक अध्यक्ष, आमदार मा. श्री. प्रवीणजी दरेकर यांचे हस्ते पुरस्कार स्वीकारताना बँकेचे चेअरमन मा.श्री. महेंद्रशेठ बोरा, व्हा.चेअरमन श्रीम. अनिताताई देशमुख, बँकेचे संचालक श्री. रिखबशेठ बाफना, श्री. सुभाषशेठ खाबिया,श्री.डॉ.महेंद्रजी भुतडा, श्री. विलासभाऊ कड, श्री. संजयभाऊ वाघ,श्री. प्रकाश शेठ बोरा,श्री.हिदायतभाई मुल्ला, श्री. प्रकाशशेठ सोनवणे,सौ. मनीषाताई वडनेरे सर्व संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.अनिलकुमार घिया,मॅनेजर श्री.प्रितम शेटे

दि वणी मर्चन्टस् को-ऑप. बँक लि., वणी



दि. महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशन लि. मुंबई यांच्यातर्फे सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार २०२५

प्रथम पुरस्कार



कॉसमॉस बँक व ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशन यांच्यातर्फे महाराष्ट्रातील उत्कृष्ट सहकारी बँक

प्रथम पुरस्कार

- मुख्यकार्यालय -

परिस

शिवाजीरोड, वणी, ता. दिंडोरी, जि. नाशिक

दूरध्वनी : (०२५५७) २२०१४०/२२००१५

- दिंडोरी शाखा -

राज कॉम्प्लेक्स

नाशिक-कळवण रोड, दिंडोरी, जि. नाशिक

दूरध्वनी : (०२५५७) २२११४०

- पंचवटी (नाशिक) शाखा -

गाळा नं. १२/१३/१४, दिपज्योती अपार्टमेंट, चिंचबन रोड, पंचवटी, नाशिक ४२२ ००३.

दूरध्वनी : (०२५३) २२१५१४१

- प्रकाशक -

श्री. महेंद्र किसनलाल बोरा

चेअरमन

दि वणी मर्चन्टस् को-ऑप. बँक लि., वणी

''परिस'' शिवाजीरोड, वणी, ता. दिंडोरी, जि. नाशिक

फोन : (०२५५७) २२०१४०/२२००१५

प्रति,

बुक-पोस्ट

सरस्वती । ९८८१४९४३४३